ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २३ जुलै, १९५८ | अंक १०

## विविध माहिती

**अहमदाबाद—कांडला हमरस्ता** — अहमदाबादपासून कांडला बंदरापर्यंत जाणारा २२० मैल लांबीचा मोठा हमरस्ता १९६१ च्या सुमारास पुरा होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. हा हमरस्ता कच्छचें रण छेदून पुढें जाईल. सध्यां ह्या रस्त्याची आखणी करणारा नकाशा तयार करण्यांत येत आहे.

**अमेरिकन तरुणी बुद्ध झाली**—सॅनफ्रॅन्सिस्को येथील एका श्रीमान् अमेरिकन व्यापाऱ्याच्या मुलीनें बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे. बुद्धधर्मांतच सुखशांतीचा लाभ होईल अशी तिची खात्री झालेली आहे. ती सुस्वरूप असूनहि तिनें आपलें केशवपन करून घेतलें आहे.

**तंबाखूबद्दल संशोधन**—सेंट्रल टोबॅको कमिटीनें केरळ राज्यांत तंबाखूविषयीं संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्राचा खर्च राज्यसरकार व मध्यवर्ती सरकार निम्मेनिम वाटून घेणार आहे. चांगल्या दर्जाच्या तंबाखूची लागवड करण्याचे प्रयत्न केंद्रामार्फत करण्यांत येणार आहेत.

**उद्योगविनिमय केंद्रांची स्थापना**—काश्मीरच्या सरकारनें श्रीनगर येथें एक व जम्मू येथें एक अशीं दोन उद्योगविनिमय केंद्रें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक केंद्रासाठीं स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली आहे. दोन्हीं केंद्रें योजना खात्यातर्फे चालविलीं जातील.

**सुएझ कालवा रुंद होणार**—सुएझचा कालवा कांहीं ठिकाणीं अधिक रुंद व खोल करण्याचें काम दोन अमेरिकन कंपन्यांनीं स्वीकारलें आहे. हें काम पूर्ण झाल्यावर अधिक मोठ्या बोटी कालव्यांतून जाऊं शकतील. सर्व कामासाठीं सुमारें ६५ लाख पौंड खर्च येईल असा अंदाज आहे.

**सुएझ कालवा बंद होण्याची शक्यता** — इराक-लेबॅनॉनमधील राजकीय अस्थिरतेचा परिणाम म्हणून सुएझचा कालवा बंद होण्याची शक्यता आहे. अमेरिकन व्यापारी वहातुकीच्या करारांतील संबंधित कलमाचा फायदा घेण्याचा विचार करीत आहेत. तेल वहातुकीवर अद्याप मात्र कांहीं परिणाम झालेला नाहीं.

**भारत—ब्रम्हदेश व्यापारी करार**—भारत व ब्रह्मदेश ह्या देशांत लवकरच एक ऐनजिनसी बदलाचा व्यापारी करार करण्यांत येणार आहे. ह्या बदलांतून भारताच्या कापडाला व ब्रह्मदेशाच्या तांदुळाला मात्र वगळण्यांत आलें आहे. ह्या वस्तूंचा व्यवहार रोखीनें करण्यांत येणार आहे. भारताकडून ब्रह्मदेश शिवण्याचीं यंत्रें, सायकली, विजेचीं उपकरणें, इत्यादि माल घेणार आहे व उलट लांकूड, कृत्रिम रत्नें, बटाटे, इत्यादि माल देणार आहे.

**आपला आवाज ऐकण्याची सोय**—रेडिओवर बोलणारे, टेलिफोनवर बोलणारे अगर व्याख्यान देणारे लोक ह्यांना आपला आवाज ऐकणाऱ्याला कसा ऐकूं येत आहे तें समजत नाहीं. एका जपानी कंपनीनें नवीन प्रकारचा मुखवटा तयार करून ही अडचण दूर केली आहे. मुखवटा घातल्यावर बोलणाऱ्याला आपला आवाज ऐकूं येऊन त्यांत बदल करतां येणें शक्य होतें. त्याची किंमत ४०० येन अथवा ६ रुपये आहे.

**कारवार येथें मेडिकल कॉलेज**—कर्नाटक विद्यापीठाला जोडलें जाणारें एक मेडिकल कॉलेज कारवार येथें काढण्यांत येणार आहे. ह्या बाबतींत कारवार व्यापारी संघाचे अध्यक्ष श्री. शानभाग ह्यांनीं पुढाकार घेतला आहे. कॉलेजसाठीं लागणारा पैसा सहकारी पद्धतीनें जमविण्यांत येणार आहे. उडपी येथील मेडिकल कॉलेजसाठीं अशाच तऱ्हेनें पैसा उभारण्यांत आला होता.

**पोलिओ प्रतिबंधक लस**—अमेरिकन नॅशनल रेड क्रॉस सोसायटीनें इंडियन रेडक्रॉसला कांहीं पोलिओ प्रतिबंधक लस देणगी म्हणून पाठविली आहे. ह्या लसीचा उपयोग करून १८,००० मुलांना टोंचण्यांत येणार आहे. ह्या रोग मुख्यतः मुलांना होतो, असें आढळून आलेलें आहे

**कापडाच्या गिरण्यांत कपात**—भारत सरकारच्या आयातीवरील निर्बंधामुळें जामनगर येथील लोकरीच्या कापडाच्या गिरण्यांत काम करणाऱ्या २५,००० कामगारांपैकीं १२,००० कामगार बेकार होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. गिरण्यांना लागणारी सामुग्री आयात करणें कठीण झाल्यामुळें हा प्रसंग ओढवला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बँका आणि पोस्टाचीं खास तिकिटें

ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनांच्या प्रसिद्धीसाठी कित्येक देश पोस्टाचीं खास तिकिटें काढीत असतात. देशाच्या राजाचें किंवा अध्यक्षाचें चित्र असणारीं तिकिटें आतां कमी होऊं लागलीं आहेत; आतांच्या तिकिटांचा उद्देश टपालखर्चाची वसुली एवढाच मर्यादित नसतो, तर देशाच्या संबंधीं गोष्टींचें ज्ञान प्रसृत करणें व प्रचार करणें, हीहि गोष्ट तिकिटांचे द्वारां साध्य केली जाते.

ह्या बाबतींत बँकांकडेहि कांहीं देशांनीं लक्ष पुरविलेलें आहे. १९५० सालीं अमेरिकन बँकर्स असोसिएशनच्या स्थापनेस ५० वर्षें पुरीं झालीं, त्यानिमित्त अमेरिकन सरकारनें खास तिकिट काढून बँकांचे उद्योगधंद्यांना, वहातुकीला, शेतीला व घरबांधणीला कसें साहाय्य होतें तें चित्रित केलें होतें. क्यूबानें २७ एप्रिल, १९५० रोजीं राष्ट्रीय बँकेची ( Banco Nacional de Cuba ) स्थापन केली, तेव्हां सिगारच्या धंद्याप्रीत्यर्थ कांहीं वर्षांपूर्वी काढलेल्या तिकिटावर बँकेचें नांव व ती उघडण्याची तारीख ही छापण्यांत आली होती.

अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय बँकेचा ( Banco de la Nacion ) ५० वा वाढदिवस १९४१ मध्यें अशाच रीतीनें साजरा करण्यांत आला होता; बँकेची मुख्य कचेरी आणि बँकेचा संस्थापक ह्यांचीं चित्रें तिकिटांवर काढलेलीं होतीं.

होंडुरास ह्या छोट्या देशानेंहि आपल्या मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेचे निमित्तानें १९५१ मध्यें दहा एअर-मेल तिकिटांवर बँकेचें नांव व स्थापनादिन छापलीं होतीं.

बँकेच्या सन्मानार्थ प्रथम तिकिट काढण्याचा मान स्वीडनचा आहे. त्या देशानें स्वीडिश पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त १९३४ मध्यें पोस्टाचें खास तिकिट काढलें. १९४५ मध्यें त्याच देशानें, गथेनबर्ग सेव्हिंग्ज बँकेनें १८२० मध्यें सुरू केलेल्या ( Gothenburg ) सेव्हिंग्ज बँकिंग-च्या १२५ व्या वाढदिवसानिमित्त दोन खास तिकिटें काढलीं. फिनलंडची पहिली सेव्हिंग्ज बँक १८२३ मध्यें सुरू झाली; १९४७ मध्यें तिच्या १२५ व्या वाढदिवसानिमित्त फिनलंडनें खास तिकिट काढलें.

बेल्जमनें आपल्या सरकारी सेव्हिंग्ज बँकेचा शंभरावा वाढदिवस खास तिकिट काढून साजरा केला; बल्गेरियानें आपल्या पोस्टल सेव्हिंग्ज बँकेच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त खास तिकिटें काढलीं. ३१ ऑक्टोबर, १९४७ हा दिवस हंगेरीनें बचत दिवस म्हणून पाळला; त्या दिवशीं बुडापेस्ट सेव्हिंग्ज बँकेचें चित्र असलेलीं तिकिटें प्रसृत करण्यांत आलीं.

पोर्तुगाल, ब्राझील, डोमिनिकन रिपब्लिक, ह्यांनीं आपआपल्या राष्ट्रीय बँकांची कामगिरी जनतेपुढें आणण्यासाठीं तिकिटें काढलेलीं आहेत. कॅनडानें गेल्या कांहीं वर्षांत लाकडाच्या फळ्या करण्याचा धंदा, खाणी, डेअरी, तेल, न्यूजप्रिंटचें उत्पादन, इत्यादींसाठीं कित्येक तिकिटें काढलीं आहेत.

---

**उद्योगपतींचा जपानचा दौरा** — अहमदाबाद व मुंबई येथील कांहीं उद्योगपती लवकरच जपानच्या दौऱ्यावर जाणार आहेत. जपानमधील कारखानदारांशीं बोलणीं करून पंचवार्षिक योजनेंतील खाजगी कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्याचा त्यांचा हेतु आहे. यंत्रसामुग्री मुख्यत: लोखंड व पोलादाच्या धंद्याशीं संबंधित अशी असेल.

## वनवर्धन

"अर्थ"च्या दि. १६ जुलैच्या अंकांत "वनवर्धन" हा श्री. वा. कृ. कोगेकर ह्यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत दुसऱ्या पॅरिग्राफमध्यें आठव्या ओळींत 'राव' असा शब्द छापला गेला आहे, तो 'राळ' ( Rasin ) असा समजावा. "भाताकरतां झाडें तोडून 'राव' तयार करतात, तो शब्द या लेखांत अभिप्रेत नाहीं व त्याचा निर्देशहि असता उपयोगी नाहीं" असें श्री. कोगेकर कळवितात.

त्याचप्रमाणें, नवव्या पॅरिग्राफमधील मुंबई राज्यांतील साखर कारखान्यांची संख्या १५ ऐवजीं २५ पाहिजे.

---

## नव्या वर्षापासून चलनांतून मागें घेण्यांत येणारीं नाणीं

एक जानेवारी १९५९ पासून पैचीं नाणीं, अर्धा पैशाचीं आणि निकल-पितळमिश्रित पिवळीं दोन आण्याचीं सर्व नाणीं प्रचारांतून काढून घेण्यांत येणार असल्याचें मध्यवर्ती अर्थ-खात्याच्या आर्थिक व्यवहार विभागानें एका प्रसिद्धिपत्रकाद्वारें जाहीर केलें आहे. त्या दिनांकापासून हीं तिन्हीं प्रकारचीं नाणीं कायदेशीर चलन म्हणून राहणार नाहींत. तथापि, हीं नाणीं ३० जून, १९५९ पर्यंत रिझर्व्ह बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, रिझर्व्ह बँकेच्या सरकारी व्यवहार करणाऱ्या सर्व एजन्सी बँकांत आणि सर्व सरकारी ट्रेझऱ्यांत व सबट्रेझऱ्यांत स्वीकारण्यांत येतील. शिवाय पुढील हुकूम काढीपर्यंत रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलूर आणि नागपूर येथील इश्यू डिपार्टमेंटमध्यें हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील.

अशा आशयाचा हुकूम भारतीय गॅझेटाच्या जादा अंकांत प्रसिद्ध झालेला आहे.

---

**आरमारी बोटीची बांधणी**—विशाखापट्टम् येथील बोटीच्या कारखान्यांत भारताच्या आरमारासाठी पहिली बोट बांधण्यांत आली आहे. बोटीचें नांव 'ध्रुव' असें ठेवण्यांत आलें असून ती ९०० टन वजनाची आहे. बंदराचें संरक्षण करणें व त्यामधील पाण्यांत पेरलेले सुरुंग काढणें ह्यासाठी बोटीचा उपयोग होऊं शकेल.

**तेल तुटलें तरी चिंता नाहीं**—इराकमधील तेलाचा पुरवठा पश्चिम युरोपला होऊं शकला नाहीं तरी फारसें बिघडणार नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे. १८ महिन्यांपूर्वी सुएझचा कालवा बंद झाला होता त्यावेळेपेक्षा हा धोका कमी आहे असें त्यांचें म्हणणें आहे. इराणच्या आखातापर्यंत अस्थिरता पसरली तर मात्र पंचाईत होण्याचा संभव आहे.

**जपानकडून बोटीची खरेदी**—सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें एका जपानी कारखान्याकडे १२,००० टन वजनाच्या बोटीची मागणी नोंदविण्याचें ठरविलें आहे. भारताला जपाननें जें कर्ज मंजूर केलें आहे त्यांतून बोटीची किंमत देण्यांत येईल. बोटीची मागणी नोंदविल्यापासून ती पुरी होण्यास १२ महिने लागतील.

**रोजगारांत घट होण्याची शक्यता**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा मूळचा ४८०० कोटी रुपयांचा खर्च ३० कोटी रुपयांनी कमी करण्यांत आल्यानें व देशांतील चढत्या किंमतींमुळें ठरविण्यांत आल्यापेक्षा २० लाख कमी लोकांना कार्यक्रमाच्या काळांत रोजगार मिळेल असा मध्यवर्ती सरकारचे नियोजनमंत्री श्री. नंदा ह्यांचा अंदाज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २३ जुलै, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### फोर्ड फौंडेशननें भारताला दिलेली मदत

अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशननें भारतामधील निरनिराळ्या विकासाच्या कार्यांना आणखी मदत जाहीर केली आहे. ही मदत शिक्षण, संशोधन व तांत्रिक बाबतींतील आहे. अमेरिकेंतील पोलादाच्या कारखान्यांत हिंदी एंजिनिअर्सना शिकवून तयार करण्यासाठी २,२५,००० डॉलर्सची देणगी देण्यांत आली आहे. १९५७ सालींहि फौंडेशननें १५,००,००० डॉलर्सची देणगी दिलेली होती. तिचा उपयोग करून २०० हिंदी एंजिनिअर्सना अमेरिकन पोलाद कारखान्यांतील कामांची पद्धत कशी असते तें दाखविण्यांत आलें होतें. नवीन मिळालेल्या देणगीमुळें आणखी १०० हिंदी एंजिनिअर्सना जरूर तें शिक्षण देतां येईल भारत सरकारला ११,००० डॉलर्स देण्यांत आले आहेत. भारतामधील परीक्षापद्धतीसंबंधीं सल्ला देण्यासाठी शिकॅगो विद्यापीठांतून एक प्राध्यापक भारतांत येणार आहे. त्या कामासाठी वरील रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूटला ७२,३०० डॉलर्सची देणगी देण्यांत आली आहे. संस्थेंत काम करणाऱ्या नौकरांना परदेशीं पाठवून शिक्षण देण्यासाठी, संस्थेसाठी पुस्तकें घेण्यासाठी आणि परदेशी तज्ज्ञ भारतांत आणण्यासाठी वरील रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. परदेशांतील तंत्रज्ञांना भारतांत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यासाठी दिल्ली विद्यापीठाला २०,००० डॉलर्स देण्यांत आले आहेत. पुणें येथील गोखले इन्स्टिटयूटला ४४,३०० डॉलर्स देण्यांत आले आहेत. भारताप्रमाणेंच ब्रह्मदेश, इंडोनेशिआ, इत्यादि पौर्वात्य देशांनाहि विविध प्रकारच्या विकासकार्यासाठी देणग्या मिळालेल्या आहेत. फौंडेशनतर्फे देण्यांत येणारी मदत उपयुक्त ठरत आहे.

---

### अफगाणिस्थानला अमेरिकेची मदत

अफगाणिस्थानचे पंतप्रधान सरदार महमद दाऊद हे अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांची ही अमेरिकेची भेट यशस्वी झालेली दिसते. अफगाणिस्थान हा रशिआचा शेजारी असल्यानें रशिआच्या इच्छेकडे त्याला अगदींच दुर्लक्ष करून चालत नाहीं. पण, त्यामुळेंच अमेरिकेचा राग ओढवून घेण्याचा प्रसंग ओढवतो. पंतप्रधानांची अमेरिकेची भेट दोन्ही दृष्टीनें यशस्वी झालेली आहे. कारण, अमेरिकेनें अफगाणिस्थानला आणखी कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे व उभयतांचे संबंध सुधारण्याची तयारीहि दाखविली आहे. अमेरिकेनें अफगाणिस्थानला आतांपर्यंत ११·७ कोटी डॉलर्स मदतीदाखल दिलेले आहेत. त्यांपैकीं कांहीं मदत कर्जाच्या रूपाची आहे, व कांहीं देणगीच्या स्वरूपांत आहे. त्याशिवाय शेतीचा माल व तांत्रिक साह्यहि देण्यांत आलेलें आहे. अफगाणिस्थानमधील 'आर्याना' विमान-कंपनीच्या वाहतुकीचा विस्तार करण्यासाठी अमेरिकन कंपनीची मदत देण्यांत आली आहे. ह्या कंपनीच्या भांडवलांत सरकारचा निर्णायक हिस्सा आहे. रशिआनें स्टॅलिनच्या मृत्यूनंतर अफगाणिस्थानकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला. रशिआनें १९५५ सालीं अफगाणिस्थानला १० कोटी डॉलर्सचें कर्ज देऊं केलें. सध्यां अफगाणिस्थानांत ५०० रशिअन तंत्रज्ञ काम करीत आहेत. अफगाणिस्थानाच्या लष्करांत रशिअन बनावटीचीं शस्त्रें मोठ्या प्रमाणावर आहेत असें म्हणतात. अफगाणिस्थान रशिआ व अमेरिका ह्या दोन्ही देशांकडून साह्य घेत असला तरी त्याचें परराष्ट्रीय धोरण तटस्थतेचें आहे पण, मध्यपूर्वेतील स्फोटक परिस्थितींत असें धोरण सांभाळणें उत्तरोत्तर कठीण होत जाण्याचा संभव आहे.

---

### हातमागाच्या धंद्याला सवलती देण्याची सूचना

भारताच्या कापडाच्या धंद्याच्या परिस्थितीची पहाणी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक कमिटी नेमलेली आहे. ह्या कमिटीकडे आंध्र हातमाग-कामगार सहकारी संस्थेतर्फे एक निवेदन पाठविण्यांत आलें आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. वीरभद्र-राव ह्या निवेदनांत म्हणतात कीं, देशांतील कापडाच्या गिरण्या भरमसाठ उत्पादन करीत आहेत. त्यांच्या उत्पादनावर नियंत्रण घालण्यांत यावें, आणि गिरण्यांतून तयार झालेल्या ४०० कोटी वार कापडालाच देशांतील बाजारपेठेंत उतरूं देण्यांत यावें. हातमागाच्या धंद्याकडे वाजवी लक्ष देण्यांत आलें पाहिजे. कारण, ह्या धंद्यांत हजारों लोकांना कामधंदा मिळत आहे. हातमागाच्या धंद्याचा विकास होण्यासाठी धोतरें आणि साड्या ह्यांच्या उत्पादनाचें काम फक्त हातमागावरच करण्यांत यावें. हातमागाच्या कापडाच्या विक्रीच्या किंमतीवर गिऱ्हाइकाला सूट देण्यांत यावी. गिरणींत तयार होणाऱ्या कापडावर अधिक कर घेण्यांत यावा. यंत्रमाग रद्द करण्यांत यावेत, आणि हातमागाचा माल अधिक प्रमाणांत निर्यात करण्यासाठी मार्ग शोधण्यांत यावेत. गिरण्यांत तयार झालेला जादा माल देशांत विकण्याची सवलत त्यांना देण्यांत आलेली आहे. त्यामुळें हातमागाच्या कापडाच्या खपावर विपरीत परिणाम झालेला आहे. गिरण्यांना दिलेल्या इतर सवलतींचाहि परिणाम असाच होत आहे. उलटपक्षीं, हातमागाच्या कापडाला आंतरप्रांतीय कर आणि स्थानिक कर असे दोन्ही प्रकारचे कर द्यावे लागत आहेत. हातमागाच्या धंद्याबाबत संशोधन करण्यासाठी व तांत्रिक शाळा उघडण्यासाठीं सरकारनें मदत करण्याची आवश्यकता आहे, असेंहि निवेदनांत म्हटलें आहे.

---

### गिरणी कामगारांना चरखा चालवायला शिकविणार !

उज्जैन येथील नाझरअलि गिरणी बंद पडल्यामुळें तिच्यांतील कामगारांवर बेकारीची पाळी आली आहे. त्यांना काम मिळवून देण्यासाठीं मध्यभारत खादी व ग्रामोद्योग बोर्डानें दोन 'अंबर परिश्रमालयें' स्थापण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक परिश्रमालयांत ५० अंबर चरखे असतील. १०० कामगारांना हे चरखे चालविण्यास शिकविलें जाईल.

### पोलादाच्या चौथ्या कारखान्याची प्राथमिक तयारी

भारताचा चौथा पोलादाचा कारखाना बोकॅरोजवळ काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या कामाची प्राथमिक तयारी सुरूहि झाली आहे. कारखान्याची जागा, रस्ते, नोकरांना रहाण्यासाठी घरें, कचेरीची जागा, इत्यादींसाठी लागणारी जागा साफसूफ करण्यांत येत आहे. ह्या कामासाठी चालू वर्षांत ५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. बोकॅरो जवळ उभारण्यांत यावयाच्या चौथ्या पोलाद कारखान्याचा समावेश तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीस अजून बराच अवकाश असल्यामुळें त्याच्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज आजच करतां येण्यासारखा नाहीं. परंतु ह्या कारखान्याचें उत्पादनाचें सामर्थ्य भिलई अगर दुर्गापूर येथें उभारण्यांत येत असलेल्या कारखान्यांपेक्षा दुप्पट असेल. त्यामुळें त्याच्या उभारणीस ७० टक्के अधिक खर्च येण्याची शक्यता आहे. बिहारचें सरकार व रेल्वेखातें कारखान्यासाठी लागणाऱ्या सवलती पुरवण्याच्या कामीं जरूर तें सहकार्य देत आहेत. भारतांत सध्या बांधण्यांत येत असलेल्या तीन पोलादाच्या कारखान्यांची प्रत्येकीं उत्पादनक्षमता १० लाख टनांची आहे. ती आणखी वाढवितां येण्यासारखी आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत दरसाल ७५ लाख टन पोलाद निर्माण होऊं लागेल. जमशेटपूर व बर्नपूर येथील बिनसरकारी मालकीच्या कारखान्यांचें उत्पादन १९६६ अखेर ४० लाख टनापर्यंत येईल. म्हणजे बोकॅरो येथील संकल्पित कारखान्याला ३५ तें ४० टन पोलाद निर्माण करावें लागेल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचें पोलादाच्या निर्मितीचें १·५ कोटी टनांचें लक्ष्य मग गांठलें जाईल.

**विजेच्या दरांत सूट**—डहाणू रोड पीपल्स को ऑपरेटिव्ह इलेक्ट्रिसिटी सोसायटीनें उजेडासाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेच्या प्रत्येक युनिटमागें ६ नये पैसे सूट देण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय घरगुती कामासाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेवर आणि औद्योगिक कामासाठी वापरण्यांत येणाऱ्या विजेवरहि सूट देण्यांत येणार आहे.

**स्त्रियांसाठी नवें कॉलेज**—मध्यप्रदेश सरकार रायपूर येथें स्त्रियांसाठी एक स्वतंत्र कॉलेज लवकरच स्थापन करणार आहे. कॉलेजसाठी धार्मिक मठाच्या एका महंतांनीं २,००,००० रुपयांची रकम आणि २०० एकर जमीन देणगीदाखल दिली आहे. ह्या भागांत स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र अशी एकहि संस्था नाहीं.

**वामनमूर्ति वंशाचा अभ्यास**—न्यू गिनी बेटांत वामनमूर्ति वंशाच्या लोकांची वस्ती आहे. ह्या बुटक्या लोकांच्या वंशाचा अभ्यास करण्यासाठी ऑस्ट्रिआंतील एक मानववंशशास्त्रज्ञ तिकडे जाणार आहेत. जपानमधील एका विद्यापीठांत ह्या विषयाच्या अभ्यासाचें एक केंद्र ते स्थापन करणार आहेत. त्यांची उमर ७२ वर्षांची आहे.

**उत्पादनवाढीचें सक्रिय कौतुक**—म्हैसूर सरकारनें बंगलोर येथील सरकारी मालकीच्या चिनीमातीच्या कारखान्यांतील कामगारांना एक महिन्याचा पगार खास बोनस म्हणून देण्याचें ठरविलें आहे. कामगारांनीं उत्साहानें काम करून कारखान्याचे इन्सुलेटर्सचें उत्पादन महिना २५ टनांवरून १४५ टनापर्यंत वाढवून दाखविलें. कारखान्याचा नुकताच विस्तार करण्यांत आला आहे.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

ठेवीदार व खातेदार ह्यांनीं ठेवीच्या रूपानें ठेवलेल्या पैशांतूनच बँकेच्या प्राप्तींत वाढ होत असते. त्यांना त्याचा योग्य तो मोबदला मिळणें जरूर आहे. बँकेच्या वाढत्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

—व्याजाचे दर—

चालू खातें : अर्धा टक्का, सेव्हिंग्ज खातें : २॥ टक्के.
मुदत ठेव तीन ते बारा महिने : ४ टक्के.
तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीच्या ठेवीवर आकर्षक व्याज.

★ आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवीमधून पैसा परत घेतांना कितीहि रकम काढावयाची असली तरी पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

चौकशी—(१) ४५५ रविवार पेठ, (२) ३६१ सदाशिव पेठ, (३) डेक्कन जिमखाना, पुणें. (४) सांगली.

गो. गं. साठे, मॅनेजर — डी. आर. नाईक, चेअरमन



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-८-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## पिकांखालील क्षेत्र व उत्पादन ह्यांची आकडेवारी व अंदाज आणि धोरण

शेतमालाच्या अचूक आणि विश्वासार्ह आंकडेवारीची आवश्यकता व महत्त्व कोणीहि कमी करूं शकणार नाहीं. तथापि, या मालाचें स्वरूपच असें आहे कीं, ही आंकडेवारी औद्योगिक मालाइतकी कधींहि अचूक असणार नाहीं.

ही गोष्ट त्यामानानें प्रगत अशा अमेरिका व इंग्लंड यांसारख्या देशांसहि लागू आहे. भारतांत या कामांत आणखी अडचणी आहेत; कारण या देशांत बहुतेक पिकें जमिनीच्या छोट्या तुकड्यांवर काढलीं जातात आणि शेतकरी या उत्पादनाचा कोठल्याहि प्रकारें हिशेब ठेवीत नाहीं.

### आंकडेवारीचें महत्त्व

शेतकीविषयक धोरणें आंखतांना मध्यवर्ती अन्न व शेतकी खातें केवळ उपलब्ध आंकडेवारीच नव्हे तर अनुभवावरून अंदाजितां येण्यासारख्या चुकांचें प्रमाणहि विचारांत घेतें.

त्याशिवाय हें खातें निरनिराळ्या सरकारी यंत्रणांकडून वेळोवेळीं निघणारे अहवाल, बिनसरकारी वार्ताहारांचीं मतें व कारभारात्मक वा व्यापारविषयक बाबींमुळें दैनंदिन संबंध येणाऱ्या सरकारी व बिनसरकारी अशा इतर माहितगार व्यक्तींचे अभिप्रायहि विचारांत घेते.

त्याचप्रमाणें या खात्याचे वरिष्ठ अधिकारी नियमितपणें दौरे काढून संभाव्य उत्पादनाचे अंदाजहि घेतात.

यावरून अन्नविषयक धोरण केवळ आंकडेवारीवरच नव्हे तर हरतऱ्हेच्या माहितीवर व माहितगार लोकांच्या अभिप्रायांवरहि आधारित असल्याचें दिसून येतें.

### क्षेत्रफळविषयक अंदाजांचा दर्जा

पिकांच्या अंदाजांच्या गुणवत्तेंत फार मोठे फरक असले तरी महत्त्वाच्या पिकांबाबतचें अंदाज क्षेत्रफळ व दर्जा या दोन्ही गोष्टींचा विचार करतां जमिनीचा वापर यांसारख्या इतर शेतीविषयक आंकडेवारीपेक्षा जास्त प्रमाणांत अचूक असतात.

याचें कारण, पूर्वीं ज्या विभागांत जमीनविषयक दस्तऐवज नियमितपणें ठेवले जात नसत वा ज्या विभागांची पाहणी होत नसे त्या विभागांत १९४८-४९ पासून पिकांखालील क्षेत्रफळाचें अंदाज घेण्याच्या पद्धतींत सुधारणा झाल्या आहेत. ही पद्धत सर्व शेतजमिनींची पाहणी होईपर्यंत व जमीनविषयक दस्तऐवज नियमितपणें ठेविले जाईपर्यंत चालू राहील.

अंदाज घेण्याच्या पद्धतींतील फरकांमुळें बराच काळपर्यंत या आंकडेवारीचा तौलनिक विचार न होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु चालू अंदाज करतांना सध्यांच्या पद्धतीनुसार लागवडीखालील क्षेत्रफळाचे संबंधित वर्षाचे व त्यामागील वर्षाचे अंतिम अंदाज करण्याची खबरदारी घेण्यांत येते.

तांदूळ व गहूं यांसारख्या महत्त्वाच्या अन्नपिकांचा विचार करतां, अंदाज येण्याच्या पद्धतींत फरक करूनहि लागवडीखालील विभागाच्या तौलनिकतेंत प्रदीर्घ कालपर्यंतहि विशेष फरक पडल्याचें दिसून येत नाहीं.

उदाहरणार्थ, तांदळाचे बाबतींत १९४९-५० मध्यें कळविण्यांत आलेलें लागवडीखालील क्षेत्रफळ ७५·४ दशलक्ष एकर असें होतें. तर १९५१-५२, १९५३-५४, १९५५-५६, १९५६-५७ व १९५७-५८ चे हेच आंकडे अनुक्रमें ७३·७ दशलक्ष, ७७·३ दशलक्ष, ७६·९ दशलक्ष, ७९.३ दशलक्ष व ७९·० दशलक्ष एकर असे आहेत.

### उत्पादन अजमाविण्यासाठी पीक कापणीची पाहणी

अन्नपिकांच्या उत्पादनाचे अंदाज घेण्यासाठी भारतीय शेतकी संशोधन मंडळानें व भारतीय आंकडेवारीविषयक संस्थेनें पीक अंदाज करण्यासाठी पीक कापणीची नमुना-पाहणी ही शास्त्रोक्त व वस्तुनिष्ठ पद्धत शोधून काढली आहे.

या पाहणीमुळें निवडक शेतजमिनीवर आलेल्या नमुना पीक पाहणीवर आधारित असा एकरीं सरासरी उत्पादनाचा वस्तुनिष्ठ अंदाज घेणें शक्य होतें.

या पद्धतीनुसार एकरीं सरासरी उत्पादन हें इतर कोठल्याहि गोष्टींवरून न ठरवितां कापणी केलेल्या नमुना पिकाचें प्रत्यक्ष वजन करून व चूक होण्याचें निश्चित प्रमाण जमेस धरून ठरविण्यांत येतें.

नमुना पाहणीच्या पद्धतीनुसार चूक होण्याचें हें प्रमाण, पीक कापणी पाहणीचे अनेक प्रयोग करून, पाहिजे तितके कमी करतां येतें.

सध्यां राज्यासाठी २ टक्के प्रमाणभूत चूक राहून सरासरी उत्पादनाचा अंदाज बांधणें हें उद्दिष्ट समोर आहे. पीक कापणी-प्रयोग करण्यांत आलेल्या विभागांसाठी अखिल भारतीय सरकारी उत्पादनाचा अंदाज आपोआपच त्याहूनहि कमी चूक राहून ठरवितां येईल.

उत्पादनाचे अंदाज तयार करण्यासाठी पीक कापणी पाहणीचा उपयोग करण्यांत येणाऱ्या विभागांत गव्हाच्या उत्पादनाच्या ९२ टक्के, तांदळाच्या ८७ टक्के आणि सर्व अन्नधान्याच्या ७१ टक्के उत्पादन सध्यां मिळतें.

याचा अर्थ अ. भा. उत्पादनाचे अंदाजांतील चूक अगदींच किरकोळ असते. आणखी म्हणजे, भारतांत विकसित झालेल्या पाहणीस 'पिकाचे अंदाज तयार करण्याची एक सर्वोत्कृष्ट पद्धति' म्हणून जागतिक अन्न व शेतकी संघटनेकडून मान्यता मिळालेली असून या संघटनेच्या विद्यमानें भारतीय तज्ञांनीं ती इतर अनेक राष्ट्रांत सुरू केली आहे.

म्हणून, तांदूळ, गहूं आणि इतर महत्त्वाच्या अन्नपिकांचे अंतिम अंदाज आतां १९४८-४९ च्यापेक्षां पुष्कळच चांगले असतात.

परंतु सदर अंदाज मध्यवर्ति अन्न व शेतकी खात्याकडून तयार होत असल्यानें त्या खात्याच्या विशिष्ट पूर्वग्रहाचा त्यावर वेळोवेळीं परिणाम होत असतो असा मुद्दा कांहीं जणांकडून उपस्थित करण्यांत येतो.

पण या शंकेंत मुळींच अर्थ नाहीं. अन्नधान्याखालील क्षेत्राची आंकडेवारी राज्यांच्या बहुधा महसूल खात्यामार्फत संपूर्ण मोजणी पद्धतीनें संकलित करण्यांत येते. यास फक्त पश्चिम बंगालचा अपवाद आहे. त्या राज्यांत नमुना पद्धतीनें ही आंकडेवारी घेण्यांत येते.

### देखरेखीची व्यवस्था

माहिती गोळा करण्याच्या या कामावर सर्वसाधारणतः राज्य-सरकारांच्या महसूल अधिकाऱ्यांची देखरेख अधिक काटेकोर करण्यासाठी नमुना पाहणी पद्धतीवर शास्त्रीय देखरेख करण्याच्या एका योजनेसाठी मध्यवर्ति सरकार राज्य सरकारांस अलीकडे आर्थिक मदत देऊं लागलें आहे.

मंत्रिमंडळ सचिवालयांतील राष्ट्रीय नमुना पाहणी विभागाच्या खास देखरेखीखालीं राज्य सरकारें करीत असलेल्या पीक कापणी प्रयोगांवर उत्पादनाचे आंकडे आधारित असतात. राज्य पातळीवर, तांत्रिक मार्गदर्शन करण्याची व हे प्रयोग करणाऱ्या

नोकरवर्गावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी महसूल, शेतकी व आंकडेवारी खात्यांत काम करणाऱ्या राज्य आंकडेशास्त्रज्ञांवर आहे.

उत्पादनाचा अखिल भारतीय अंदाज राज्यनिहाय मिळालेल्या आंकड्यांची केवळ बेरीज असते. संबंधित यंत्रणांशीं विचारविनिमय केल्याशिवाय आणि राज्य व जिल्ह्याच्या आंकड्यांत त्याप्रमाणें बदल केल्याशिवाय कोठल्याहि एका यंत्रणेस एकदाहि आंकडा बदलतां येत नाहीं.

लागवडीखालीं असलेल्या क्षेत्रफळांत फेरफार व पद्धतींतील बदल यामुळें अन्नोत्पादनाच्या आंकड्यांचीं अनेक वर्षांचे बाबतींत तुलना करतां न येण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे.

ही अडचण दूर करण्यासाठी मध्यवर्ति अन्न व शेतकी खात्यानें मध्यवर्ति आंकडेवारी संघटनेशीं विचारविनिमय करून १९५१ मध्यें पीक उत्पादनाचे निर्देशांक तयार करण्यासाठी उपाय योजले. या निर्देशांकावरून निरनिराळ्या पिकांच्या उत्पादनांतील अनेक वर्षांतील तौलनिक फरक कळूं शकतात.

## निर्देशांक तयार करण्याची योजना

१९४९–५० हें मूळ वर्ष धरून निर्देशांक तयार करण्याची योजना जुलै १९५४ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. तेव्हांपासून शेतकी उत्पादनाचे निर्देशांक नियमितपणें प्रसिद्ध होत असतात.

निर्देशांक तयार करतांना लागोपाठ दोन वर्षांतील उत्पादनाच्या आंकड्यांची तुलना करतां येते.

उदाहरणार्थ १९५६–५७ च्या आंकड्यांचा आपण विचार करूंया. या वर्षीच्या उत्पादनाच्या अखेरच्या अंदाजाशीं १९५५-५६ च्या दुरुस्त आंकड्यांशीं तुलना करतां येईल. हे दोन वर्षांचे आंकडे ठराविक क्षेत्रफळाविषयीं असून ते अंदाज करण्याच्या एकाच पद्धतीवर आधारित आहेत. त्यामुळें हे आंकडे प्रत्येक पिकांतील वा अनेक पिकांच्या गटांतील उत्पादनांत १९५५-५६ पेक्षां १९५६–५७ मध्यें झालेल्या फरकांचा अचूक टक्केवारी अंदाज देऊं शकतात.

त्याचप्रमाणें १९५४–५५ शीं तुलना करतां १९५५–५६ ची परिस्थिति याच पद्धतीनुसार कळूं शकते. याप्रमाणें मागील वर्षांचा हिशोब करून प्रत्येक पिकाचें तौलनिक उत्पादन (मूळ प्रमाण १९४९–५० = १००) अचूकरीत्या ठरवितां येतें. अशा निर्देशांकास त्या पिकाच्या उत्पादनाचा तौलनिक आंकडा देणारा निर्देशांक असें म्हणतात.

एकेका पिकाबाबतच्या या निर्देशांकांचा, गट निर्देशांक तयार करण्यासाठी उपयोग करण्यांत येतो. उदा. अन्नधान्याच्या उत्पादनाचा निर्देशांक, शेतकी उत्पादनाचा सर्वसाधारण निर्देशांक. अशा निर्देशांकावरून एखाद्या वर्षांत वा ठराविक कालांत दुसऱ्या वर्षापेक्षां उत्पादनांत किती वाढ झाली त्याची विश्वासार्ह कल्पना येऊं शकते.

राज्य सरकारें हे निर्देशांक विशिष्ट वर्षांतील सर्वोत्कृष्ट अंदाजांवर आधारित असल्यानें त्यांत मध्यवर्ती सरकारनें बदल करणें योग्य ठरणार नाहीं, असें वाटतें. मात्र आवश्यक त्या दुरुस्त्या फक्त निर्देशांकांत करण्यांत येतात.

आणि म्हणून चालू व मागील वर्षांतील विशिष्ट पीक, अंदाजांची तुलना करून ते निर्देशांक दीर्घ मुदतीच्या तुलनांसाठीं वापरणें ही योग्य पद्धत आहे असें वाटतें.

मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यांत या पद्धतीचा नेहमीं अवलंब केला जातो.

## अंतिम आणि त्यापूर्वीचे अंदाज

पिकाच्या कापणीच्या काळांत तयार करण्यांत येणाऱ्या अंतिम अंदाजाखेरीज कांहीं महत्त्वाच्या पिकांचे त्यापूर्वीचे अंदाजहि तयार करण्यांत येतात. उदा. तांदूळ, गहूं, ज्वारी आणि बाजरी यांच्या अंदाजांचे दिनांक पुढीलप्रमाणें आहेतः—

| | | |
|---|---|---|
| तांदूळ | पहिला | २० ऑक्टोबर |
| | दुसरा | २० डिसेंबर |
| | अंतिम | २० फेब्रुवारी |
| गहूं | पहिला | २० जानेवारी |
| | दुसरा | २० मार्च |
| | अंतिम | ३० मे |
| ज्वारी | पहिला | २१ नोव्हेंबर |
| | दुसरा | २१ फेब्रुवारी |
| | अंतिम | २१ एप्रिल |
| बाजरी | पहिला | २१ नोव्हेंबर |
| | दुसरा | २१ मार्च |

## अधिक विश्वसनीय अंदाज कोणता ?

अंतिम अंदाज आणि त्याच्या पूर्वीचे अंदाज यांमध्यें पुष्कळ तफावत पडत असल्यानें त्यांच्यापैकीं कोणताहि अंदाज विश्वसनीय नाहीं अशी टीका कांहीं वेळां करण्यांत येतें. परंतु भारतासारख्या, पीक हंगामांतील प्रादेशिक फरक फार मोठा असलेल्या देशांत अंदाजांतील लागवडीखालील क्षेत्र मोठें असल्यानें सामान्यतः पूर्वीच्या अंदाजापेक्षा अंतिम अंदाज हा साहजिकच अधिक असतो. पिकांचे अहवाल पाठविण्याची पद्धति भारतांत सुरू झाल्यापासून हें असेंच घडत आलें आहे.

उदा. :—एखाद्या राज्यानें तयार केलेल्या तांदळाच्या पिकाच्या दुसऱ्या अंदाजांत त्यानंतर पेरणी झालेल्या क्षेत्राचा अंतर्भाव नसतो. तसेंच या पिकाचे अहवाल सादर न करणारे विभाग म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या विभागांचे अंदाजहि अंतिम अंदाजाच्या वेळीं मिळूं शकतात. सर्वच अंतिम अंदाजांच्या बाबतींत हीच गोष्ट घडते.

गेल्या तीन वर्षांत तांदळाच्या पिकाच्या दुसऱ्या अंदाजांतील सरासरी क्षेत्रापेक्षा अंतिम अंदाजांतील क्षेत्र ५·१ दशलक्ष एकरांनीं अधिक आहे.

दुसऱ्या अंदाजांत असलेल्या पिकाच्या परिस्थितीनंतरच्या सुमारें तीन महिन्यांतील पिकांची परिस्थिति अंतिम अंदाजांत असते व या तीन महिन्यांत पिकाच्या परिस्थितींत साहजिकच खूप फरक पडत असल्यानें दुसऱ्या व अंतिम अंदाजांत फार मोठा फरक पडावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

तथापि, दुसऱ्या अंदाजाच्या वेळेस पीक कापण्यासाठीं तयार झालेलें नसल्यानें पारंपारिक पद्धतीनें पिकाचा अंदाज करण्यांत येतो तर अंतिम अंदाजांतील उत्पादन बहुंशीं पीक कापणी नमुना पद्धतीनें देण्यांत येतें.

म्हणून चालू वर्षीच्या दुसऱ्या अंदाजाची तुलना त्या वर्षीच्या पहिल्या अगर अंतिम अंदाजाशीं न करतां त्यामागील वर्षाच्या दुसऱ्या अंदाजांशीं केली पाहिजे.

पूर्वीचा अंदाज म्हणजे तो अंदाज तयार करतांना पिकाची परिस्थिति काय होती याबाबतच्या अंदाजापेक्षा त्याला अधिक महत्त्व नसल्यानें त्या तारखेनंतर कित्येक महिन्यांनीं पिकाची परिस्थिति काय असेल त्या बाबतचा तो अंदाज नव्हे.

तथापि अंतिम अंदाज हा इतर अंदाजांपेक्षा आंकडेशास्त्रीयदृष्ट्या अधिक बिनचूक असतो याबद्दल संशय नाहीं.

PRATIBHA/LIC/



# मी अजून त्याचा विचारच केला नाहीं...

प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावयाची पद्धत उत्तमच, पण विमा उतरवावा कीं नाहीं याचा विचार करीत बसलांत तर कोणी सांगावं उद्यां तुमचं काय बरं वाईट होईल आणि मग विमा न उतरविल्याचा परिणाम तुमच्या लाडक्या मुलबाळांना आणि बायकोला भोगावा लागेल. तुमचं वय अजून कांहीं फार नाहीं, म्हणून आजच्या इतका स्वस्त विमा पुढें कधींहि मिळूं शकणार नाहीं. विमा उतरवा आणि आपला भविष्यकाल सुरक्षित करा.



## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

★ होतकरू संसारी तरुण–तरुणींसाठी ★

श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

कण आणि क्षण रु. २=५०

पुढे पाऊल रु. २=००

तुमचें स्थान कोणतें ? रु. २=००

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन

तुमचें शुभचिंतन प्रभावी करा !

—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

## नोटीस

या बँकेच्या सन १९५८-५९ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा-कचेऱ्यांच्या नोटिसबोर्डावर निवडणुकीचे नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी सदर निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें शनिवार दि. ९ ऑगस्ट १९५८ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवून द्यावींत.

सदर बाबतींत जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या कामाच्या वेळांत मिळूं शकेल.

पुणें २, दि. १२-७-५८ — वा. ग. अळतेकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या सन १९५८-५९ च्या हिशेबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेंत दोन हिशेबतपासनिसांची नेमणूक करावयाची आहे.

सदर जागांसाठी ज्यांस उमेदवार म्हणून उभे राहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें येथील मुख्य कचेरींत गुरुवार दि. ३१ जुलै १९५८ रोजीं दुपारी चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी पोंचतील अशा बेतानें पाठवून द्यावेत.

उमेदवारांनीं आपल्या अर्जांत स्वतःचें संपूर्ण नांव, पत्ता व शैक्षणिक लायकी नमूद केली पाहिजे.

हिशेबतपासनिसांच्या नेमणुकीबाबतचे बँकेनें केलेले नियम बँकेच्या मुख्य कचेरींत कामाच्या वेळांत पाहावयास मिळतील.

पुणें २. दि. १२-७-५८ — वा. ग. अळतेकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

**रेल्वेसाठी परदेशीय हुंडणावळ**—भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान आर्थिक मदतीसंबंधीं सध्या वाटाघाटी चालू आहेत. ह्या वाटाघाटींत रेल्वेला लागणाऱ्या परदेशीय हुंडणावळीच्या प्रश्नाला बरेंच प्राधान्य देण्यांत येत आहे. रेल्वेच्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी १,१२५ कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकीं ४२५ कोटी परदेशी हुंडणावळीच्या रूपांत लागतील.

**सौराष्ट्रांतील आरोग्यधाम**—सौराष्ट्रांतील सोरठ जिल्ह्यांतील चोरवाड ह्या समुद्रकाठी असलेल्या गांवाचा आरोग्यधाम म्हणून विकास करण्यांत येणार आहे. ह्या ठिकाणीं लोकांना रहाण्यास सोयीच्या अशा बऱ्याच इमारतीहि आहेत. गांव रेल्वेला जवळ असून राजकोट व जुनागड ह्या शहरांशीं सिमेंटच्या पक्क्या रस्त्यानें जोडलेलें आहे.

**राजकन्या जमीनदार झाली**—ब्रिटिश कोलंबिआनें प्रिन्सेस मार्गारेट ह्यांना ५५० एकरांचें एक बेट भेट म्हणून बहाल केलें आहे. ह्या बेटाचें पूर्वीचें नांव पोर्टलँड असें होतें. आतां तें प्रिन्सेस मार्गारेट बेट असें ठेवण्यांत आलें आहे. आतां त्या कोलंबिआ प्रांतातल्या जमीनदार झाल्या आहेत.

## सदाचारने पगले

(श्री. वा. काळे ह्यांच्या "पुढें पाऊल" चा प्रा. ओझाकृत गुजराती अनुवाद)

'सदाचारने पगले' पुस्तक मळी गयुं अने वांची गयो. सामाजिक प्रश्नो अने समाजजीवन ए मारो विषय छे. एटले मने तो बीजा प्रांतना अधिकारी पुरुषनी दृष्टि जाणवामां सविशेष आनंद पडे. मने ए पुस्तक खरेखर गम्युं छे. 'सुखी जीवननी पगदंडी' पण हुं मेळवीने जरूर वांची लईश. आवुं पुस्तक गुजरातीमां उतारवा माटे तमने मारां अभिनंदन अने श्री काळेने पण.

आणंद, २४-५-१९५८ — ईश्वर पेटलीकर, संपादक 'संसार', आणि सुप्रसिद्ध कादंबरीकार

## Higher Diploma in Co-operation

Prize Winners in the Examination held in April 1958

| Name of the student | Amount of Prize | Name of the Institution donating the prize |
|---|---|---|
| Hari Sidhanath Kane | Rs. 100/- | The Bombay State Co-operative Bank Ltd., Bombay. |
| Vasant Shridhar Ghadgay | Rs. 100/- | The Bombay State Industrial Co-operative Association Ltd., B'bay. |


# KHOSLA'S DIRECTORY

*HAS MOST*

**Extensive International Circulation**

Most important link between Manufacturers and Buyers

Do not fail to reserve space early for your displayed advertisement in 28th edition.

Solus Position Limited.

Special Section for Trademarks.

RATES ON APPLICATION

**Khosla Publishing Co.,**

**Post Box 1389, Delhi.**


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२।१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.